
# पेपर-बॅग राजकुमारी

रॉबर्ट मन्श


मराठी-मानसी महाजन




एलिझाबेथ नावाची एक सुंदर राजकुमारी होती. ती महालात राहायची, आणि राजकुमारी घालतात तसे उंची कपडे घालायची. रोनाल्ड नावाच्या राजपुत्राशी तिचा विवाह ठरला होता.



पण दुर्भाग्य असे की एका ड्रॅगनने तिचा महाल उध्वस्त केला, तिचे सगळे उंची कपडे आपल्या श्वासाने जाळून टाकले आणि राजपुत्र रोनाल्डला पळवून नेले.




ड्रॅगनचा पाठलाग करून रोनाल्ड्ला वाचवून परत आणायचे असे एलिझाबेथने ठरवले.
अंगावर घालायला म्हणून तिने इकडे तिकडे कपडे शोधले, पण सगळे जाळून गेले होते. न जळालेली अशी फक्त एक कागदी पिशवी तिला सापडली. तिने तीच पिशवी अंगावर चढवली आणि ड्रॅगनच्या मागे निघाली.
ड्रॅगनचा पाठलाग करणं सोपं होतं, कारण त्याने रस्ताभर जळालेली झाडं आणि घोड्यांची हाडं सोडली होती.



बऱ्याच वेळानी एलिझाबेथ एका गुहेपाशी पोहोचली. गुहेच्या दारावर दार वाजवायची मोठी खुंटी होती. ती धरून तिने जोरात दार वाजवले.

ड्रॅगनने दार उघडून आपले नाक बाहेर काढले आणि म्हणाला, "वाह! राजकुमारी! मला राजकुमारी खायला फार आवडते, पण मी आत्ताच एक अख्खा महाल खाल्ला आहे. माझं पोट पण भरलंय आणि मला वेळसुद्धा नाही आहे. तू उद्या ये."


असं म्हणून त्याने इतक्या पट्कन आणि धाड्कन दार बंद केलं, की एलिझाबेथचं नाक दारावर आपटता आपटता वाचलं.



एलिझाबेथने पुन्हा दरवाजा जोरजोरात वाजवला. ड्रॅगनने पुन्हा आपलं नाक बाहेर काढलं आणि म्हणाला, "जा बघू! मला राजकुमारी खायला आवडते, पण आज मी एक महाल खाल्ला आहे, त्यामुळे माझं पोट भरलंय, आणि मला वेळ नाही आहे. तू उद्या ये!"


"थांब!" एलिझाबेथ ओरडली. "अख्ख्या जगात तूच सर्वात हुशार आणि भयानक ड्रॅगन आहेस हे खरं आहे का?"

"हो तर!" ड्रॅगन म्हणाला.



"तुझ्या आगीच्या एका श्वासात तू दहा अरण्य भस्म करू शकतोस हे खरं आहे?" एलिझाबेथ ने विचारले.

"हो तर!" ड्रॅगन म्हणाला. एक मोठ्ठा श्वास घेऊन त्याने प्रचंड आग बाहेर सोडली. त्या आगीने पन्नास अरण्ये भस्म झाली!



"फारच छान!" एलिझाबेथ म्हणाली. ड्रॅगनने अजून एक खोल श्वास घेतला आणि शंभर अरण्ये जाळून जातील एवढी आग श्वासातून बाहेर सोडली.
"सुरेख!" एलिझाबेथ म्हणाली. ड्रॅगनने अजून एकदा खोल श्वास घेतला, पण या खेपेला काहीच बाहेर आलं नाही. एक साधा बटाटा भाजला जाईल एवढीसुद्धा धग त्याच्या श्वासात उरली नव्हती.




मग एलिझाबेथ म्हणाली, "ड्रॅगन, तू दहा सेकंदात अख्ख्या पृथ्वीला प्रदक्षिणा घालू शकतोस हे खरं आहे का?"
"हो तर!" ड्रॅगन म्हणला, आणि आकाशात झेप घेऊन पसार झाला. दहा सेकंदात तो अख्ख्या पृथ्वीला प्रदक्षिणा घालून परत आला सुद्धा! परतला तेव्हां तो खूप दमला होता.
एलिझाबेथ म्हणाली, "मस्त! परत करून दाखव न!"



ड्रॅगनने पुन्हा आकाशात झेप घेतली, आणि वीस सेकंदामध्ये पृथ्वीला प्रदक्षिणा घालून परत आला.
या खेपेला तो परत आला तेव्हां एवढा दमला होता की काही बोलू सुद्धा शकत नव्हता. तसाच आडवा झाला आणि झोपून गेला.




एलिझाबेथने हळूच ड्रॅगनला हाक मारली.
"ड्रॅगन... " ड्रॅगन काही जागचा हलला नाही.
मग तिने ड्रॅगनच्या कान उघडून त्यात आपलं
डोकं खुपसलं आणि शक्य तेवढ्या मोठ्याने
ओरडली, "ड्रॅगन....... !"
ड्रॅगन एवढा दमला होता की तो अजिबात
हलला नाही.



ड्रॅगनला ओलांडून एलिझाबेथ गुहेच्या दाराशी गेली आणि तिने दार उघडलं.

समोर राजपुत्र रोनाल्ड उभा होता. तिच्याकडे बघून तो म्हणाला, "एलिझाबेथ, काय तुझा अवतार! तुझ्या अंगाला राखेसारखा वास येतोय, तुझ्या केसांच्या झिंज्या झाल्या आहेत आणि तू अंगात ही घाणेरडी कागदाची पिशवी घातली आहेस! जा इथून, आणि व्यवस्थित राजकुमारीसारखी नटून परत ये!"



"रोनाल्ड.." एलिझाबेथ म्हणाली, "तुझे कपडे खूप सुंदर आहेत, आणि तुझे केस अगदी व्यवस्थित आहेत. तू अगदी राजपुत्रासारखा दिसतो आहेस, पण तू खरं तर अगदीच गाढव आहेस!"

शेवटी त्या दोघांचा विवाह झालाच नाही!



समाप्त